# कादंबरी.

वि. का. राजवाडे.

॥ श्री ॥

# कादंबरी.

(या विषयाचे तात्त्विक विवेचन करणारा निबंध.)

लेखकः—

इतिहासाचार्य

वि० का० राजवाडे

प्रकाशक व मुद्रकः—विनायक शंकर वैद्य वाङ्मय विशारद.

आनंद प्रेस सातारा.

विजयादशमी शके १८५०

किंमत चार आणे.

# प्रास्ताविक दोन शब्द.

सत्यान्वेषण हे संशोधनाचें ध्येय आहे. इतिहास, समाज, भाषा इत्यादि पुरातत्वाचीं जीं प्रधान अंगें आहेत त्यांच्या संबंधीं सत्यान्वेषण करण्याच्या इच्छेनें जें संशोधन कार्य कै राजवाडे यांनीं केलें तें कमी अधिक प्रमाणानें सर्वांच्या परिचयाचे आहे. त्याच सत्यान्वेषणाबाबत झालेल्या संशोधनाच्या आणखी एका अंगाचें आविष्करण प्रस्तुतच्या " कादंबरी " ह्या निबंधाच्या प्रकाशनानें होत आहे. राजवाडे ह्यांच्या लिखाणामध्यें त्या त्या विषयाच्या योग्य परिष्कार येऊन पुन्हां त्या त्या विषयावरील तात्विक स्वरूपाचें चिरस्थायी असें विवेचन येत असतें. त्या त्या विषयाचें तें एक प्रकारचें तत्वज्ञानच असें. त्याप्रमाणें प्रस्तुत निबंधांत कादंबरीचें तात्विक स्वरूप " Philosophy of fiction दाखविलें आहे. व हें तात्विक स्वरूप दाखवितांना अद्भुत कादंबरीची परंपरा, त्यांचा जुना इतिहास, इंग्लंड, फ्रान्स, रशिया ह्या देशांतील उत्कृष्ट वास्तविक व अद्भूत कादंबरीकार कोणते व त्या मापानें तोलावयाचें झाल्यास मराठी कादंबरीकारांची योग्यता काय ठरते व त्यांच्यापासून कोणती अपेक्षा करावयाची इत्यादि प्रश्नांचा विचार त्यांनीं केला आहे. " सहानुभूतिप्रमाणें सत्याकडे व प्रोत्साहनाप्रमाणेंच प्रगतिकडे विशेष लक्ष पुरविण्याचा राजवाड्यांचा नेहमींचा हेतु असल्यामुळें त्यांनीं मराठी कादंबऱ्याची जगांत असणाऱ्या उत्कृष्ट सवर्गीयसारस्वताशीं तुलना केली व मराठी कादंबऱ्यांच्या बाबतींत इतर राष्ट्रांच्या मानानें आपण किती मागें आहोंत, आपली किती निराशेची स्थिती आहे ह्याची जाणी करून दिली. समाधान इतकेंच कीं आपण त्या प्रगतीच्या मार्गावर मात्र आहोंत व पाऊल पुढें पडत आहे. व योग्य मार्गानें जर ह्या सारस्वताची जोपासना आपण केली तर टॉलस्टॉय, ह्युगो, झोला, स्कॉट, फील्डींग, डिकन्स ह्यांच्या तोडीचे कादंबरीकार महाराष्ट्रांत खास उत्पन्न होतील.

कादंबरीकाराला श्रेष्ठ विद्या, विस्तृत वाचन, मोठा प्रवास तीक्ष्ण निरीक्षण, कडक परीक्षण, थोर औदार्य, गाढ सहानुभूति, नाटका